जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे
इमेल
cp.thane.pro@mahapolice.gov.in

प्रेसनोट **दिनांक १७.०७.२०२६**

‘ वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक महिला दलाल आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ’

ठाणे शहराच्या **‘‘हॉटेल स्नेहा फॅमिली रेस्टॉरंन्ट ॲन्ड बार, शंभुजी हॉटेलच्या बाजुला, विजय गार्डन रोड, कावेसर, ठाणे पश्चिम’’** या ठिकाणी एक महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावून वेश्यागमनासाठी बोलवणार आहे अशी गुप्त माहिती, गुप्त माहितीदारामार्फत ठाणे गुन्हे शाखेच्या अंतर्गत असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वपोनिरी/अंजली आंधळे यांना मिळाली होती.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर या शाखेने दिनांक १६/०७/२०२६ रोजी ‘‘हॉटेल स्नेहा फॅमिली रेस्टॉरंन्ट ॲन्ड बार, शंभुजी हॉटेलच्या बाजुला, विजय गार्डन रोड, कावेसर, ठाणे पश्चिम’’ या ठिकाणी सापळा लावून एक महिला दलाल आरोपीस १४:३८ वाजता ताब्यात घेवून लागलीच अटक करुन तीचे तावडीतून ०२ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर महिला दलाल आरोपी विरुध्द **कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे दिनांक १६/०७/२०२६ रोजी २३:५५ वा. गुन्हा रजि.नंबर ४५४/२०२६ भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३ (१) १४३ (३) सह स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे** गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच ०२ पिडीत बळीत महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने मा.अधिक्षक, रेस्क्यु फाउंडेशन, पोईसर, कांदिवली, मुंबई येथे ठेवण्यात आले आहे.

सदर कारवाई ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे तसेच श्री.मदन बल्लाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वपोनि/अंजली आंधळे, मसपोनि- स्नेहल शिंदे, मपोउपनि- दिक्षा ढाकरे, पोहवा/१७४५ व्ही. जी. नाईक, पोहवा/७३९ डी.पी.महाले, पोहवा/३६६३ आर.यु.सुवारे, मपोहवा/७४२७ आर.के.भगत, मपोहवा/३६२९ ए. एस. मोरे, मपोअं/८१३१ पी.जी. खरात, मपोअं/२१७ एच. आर. थोरात, चापोअंम/५५३९ व्ही. के. निकम यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.